## ३. वाक्यसंश्लेषण

**(१) केवल वाक्य**

**खालील वाक्ये लक्षपूर्वक अभ्यासून त्यांतील उद्‌देश्य व विधेय शोधा.**

(१) मामा, घड्याळ आणले का?

(२) झाशीची राणी लक्ष्मीबाई अतिशय शूर होत्या.

(३) विद्यार्थ्यांनो, पाहुण्यांच्या सत्कारासाठी गुलाबाची फुले आणा.

वरील वाक्यांचे निरीक्षण केल्यानंतर तिसऱ्या वाक्यात '**विद्यार्थी**' उद्‌देश्य आणि '**आणा**' हे विधेय आहे हे लक्षात येते. इतर शब्द उद्‌देश्य विस्तार किंवा विधेय विस्तार आहेत; पण प्रत्येक वाक्यात एकच उद्‌देश्य आणि एकच विधेय असल्यामुळे अशा वाक्यांना '**केवल वाक्य**' म्हणतात.

**केवल वाक्याची वैशिष्ट्ये**

- एकच उद्‌देश्य व एकच विधेय असते.
- या वाक्यात कमीत कमी शब्द असतात.
- केवल वाक्ये विधानार्थी, आज्ञार्थी, प्रश्नार्थी, होकारार्थी वा नकारार्थी असू शकतात.
- केवल वाक्य तयार करताना कोणतेही उभयान्वयी अव्यय वापरले जात नाही.

**(२) मिश्र वाक्य**

**खालील वाक्ये वाचा व निरीक्षण करा.**

(१) गुरुजी म्हणाले, की प्रत्येकाने नियमित अभ्यास करावा.

(२) आकाशात जेव्हा काळे ढग जमतात, तेव्हा पाऊस पडतो.

(३) जे चकाकते, ते सोने नसते.

वरील तीन वाक्यांतील तिसऱ्या वाक्यात '**ते सोने नसते**' या स्वतंत्र वाक्यावर 'जे चकाकते' हे वाक्य अवलंबून आहे. म्हणजे जे वाक्य स्वतंत्र असते त्याला '**मुख्य**' किंवा '**प्रधान**' वाक्य असे म्हणतात व अवलंबून असणाऱ्या वाक्याला '**गौण वाक्य**' म्हणतात. दुसऱ्या वाक्यात '**पाऊस पडतो**' हे प्रधान वाक्य असून '**आकाशात काळे ढग जमतात**' हे गौण वाक्य आहे. ही वाक्ये जेव्हा–तेव्हा या गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययाने जोडलेली आहेत.

**मिश्र वाक्याची वैशिष्ट्ये**

- एक प्रधान वाक्य व एक किंवा अनेक गौण वाक्ये असतात.
- दोन्ही वाक्ये गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात.
- जोडलेली वाक्ये ही अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र नसतात.
- गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडल्यामुळे तयार होणारे नवीन वाक्य मिश्र वाक्य असते.

गौणत्वसूचक उभयान्वयी अव्यये–

| |
|---|
| म्हणजे, की, म्हणून, जे, कारण, का, यास्तव, सबब, जर, जरी, जेव्हा–तेव्हा इत्यादी. |

**(३) संयुक्त वाक्य**

**पुढील वाक्ये अभ्यासा.**

(१) मी पहाटे लवकर उठते व एक तास अभ्यास करते.

(२) संध्याकाळी मी फिरायला जातो किंवा खेळायला जातो.

(३) आजी नोकरीतून निवृत्त झाली म्हणून तिला सवड मिळाली.

वरील वाक्यांत दोन किंवा अधिक वाक्ये आहेत आणि ती एकमेकांना अनुक्रमे 'व', 'किंवा', 'म्हणून' या प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली आहेत.

**संयुक्त वाक्याची वैशिष्ट्ये**

- दोन किंवा अधिक केवल वाक्ये असतात.
- ही वाक्ये प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी एकमेकांना जोडलेली असतात.
- जोडलेली वाक्ये ही अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र असतात.
- एकमेकांना प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडून तयार होणारे जोडवाक्य 'संयुक्त वाक्य' असते.

प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्यये-

आणि, नि, व, शिवाय, अथवा, वा, की, किंवा, पण, परंतु, परी, बाकी, म्हणून, सबब, यास्तव याकरिता इत्यादी.

मिश्र वाक्य व संयुक्त वाक्यांतील फरक लक्षात घ्या.

| मिश्र वाक्य | संयुक्त वाक्य |
|---|---|
| (१) एकच प्रधान वाक्य असते. बाकीची गौण वाक्ये असतात. | (१) दोन किंवा त्यापेक्षा अधिक प्रधान वाक्ये असतात. |
| (२) गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात. | (२) प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात. |
| (३) जोडलेली वाक्ये ही अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र नसतात. | (३) जोडलेली वाक्ये ही अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र असतात. |

**लक्षात ठेवा-** मिश्र व संयुक्त वाक्यांत काही अव्यये समान असली तरी जोडली जाणारी वाक्ये आणि अव्ययांचे वाक्यांतील अर्थ लक्षात घेऊन वाक्य मिश्र की संयुक्त हे ठरवावे.

**(१) वाक्यसंश्लेषण किंवा वाक्यसंकलन**

एकमेकांशी संबंध असलेली दोन किंवा अधिक केवल वाक्ये दिली असता ती एकत्र करून त्यांचे एक वाक्य तयार करण्याच्या क्रियेला '**वाक्यसंश्लेषण**' म्हणतात.

**वाक्यसंश्लेषणाची आवश्यकता**

- वाक्यरचनेवर प्रभुत्व संपादन करण्यासाठी.
- आपल्या मनातील भाव नेमकेपणाने व्यक्त करण्यासाठी
- सुटी-सुटी, विस्कळीत वाक्ये लिहिण्यापेक्षा एकत्रित वाक्य मांडून विचारात सुसूत्रता आणण्यासाठी
- उत्तम लेखनकौशल्य विकसनासाठी, वाक्यसंश्लेषणाची कला अवगत करण्यासाठी

वाक्यसंश्लेषणात दोन किंवा अधिक वाक्ये एकत्र केल्यानंतर एक '**जोडवाक्य**' तयार होते. वाक्यसंश्लेषण तीन प्रकारचे असते.

**वाक्यसंश्लेषणाचे प्रकार**

(१) दोन किंवा अनेक केवल वाक्यांचे एक केवल वाक्य बनवणे.

(२) दोन किंवा अनेक केवल वाक्यांचे एक मिश्र वाक्य बनवणे.

(३) दोन किंवा अनेक केवल वाक्यांचे एक संयुक्त वाक्य बनवणे.

**लक्षात ठेवा–** केवल, मिश्र व संयुक्त वाक्यांचे परस्पर रूपांतर करता येते.

**(१) केवल वाक्य तयार करणे.**

(१) आजी गुळगुळीत रस्त्यावरून चालत होती. तिचा पाय घसरला. ती पडली.
→ आजी गुळगुळीत रस्त्यावरून चालताना पाय घसरून पडली.

(२) माझ्या शाळेने मला बक्षीस म्हणून बंद डबा दिला. त्यात आकर्षक स्मृतिचिन्ह होते.
→ माझ्या शाळेने आकर्षक स्मृतिचिन्ह असलेला बंद डबा मला बक्षीस म्हणून दिला.

(३) राजू वारंवार कॉफी पितो. त्याच्या आईला ते आवडत नाही.
→ राजूचे वारंवार कॉफी पिणे त्याच्या आईला आवडत नाही.

(४) रवींद्रनाथ टागोर हे थोर कवी होते. रवींद्रनाथ टागोर यांनी 'गीतांजली' हे काव्य लिहिले.
→ थोर कवी रवींद्रनाथ टागोर यांनी 'गीतांजली' हे काव्य लिहिले.

वरील वाक्यांवरून असे लक्षात येते, की दोन किंवा अधिक वाक्यांचे वाक्यसंश्लेषण करताना धातुसाधित नामे, विशेषणे, समानाधिकरणात्मक शब्द (समान अर्थाची शब्दयोजना) किंवा शब्दसमूह वापरावेत. क्रियापद मात्र एकच वापरावे.

**(२) मिश्र वाक्ये तयार करणे.**

(१) आई म्हणाली. मोड आलेल्या धान्यात खूप प्रथिने असतात.
→ आई म्हणाली, की मोड आलेल्या धान्यात खूप प्रथिने असतात.

(२) शरयू वक्तृत्व स्पर्धेत प्रथम आली. तिने खूप सराव केला.
→ शरयू वक्तृत्व स्पर्धेत प्रथम आली, कारण तिने खूप सराव केला.

(३) आमचा उत्साह व आमचे स्मरण वाढावे. आम्ही शीर्षासन करतो.
→ आमचा उत्साह व आमचे स्मरण वाढावे म्हणून आम्ही शीर्षासन करतो.

(४) मला रेल्वेचे निश्चित आरक्षण मिळायला हवे. मी दिल्लीला जाईन.
→ मला रेल्वेचे निश्चित आरक्षण मिळाले, की मी दिल्लीला जाईन.

**लक्षात ठेवा–** केवळ गौणत्वसूचक उभयान्वयी अव्यये वापरून मिश्र वाक्ये तयार करावीत.

**(३) संयुक्त वाक्ये तयार करणे.**

(१) नाटकाची तिसरी घंटा वाजली. नाटकाला सुरुवात झाली.
→ नाटकाची तिसरी घंटा वाजली आणि नाटकाला सुरुवात झाली.

(२) कृतिपत्रिका सोपी असते. कृतिपत्रिका अवघड असते. ती सोडवावी लागते.

→ कृतिपत्रिका सोपी असो किंवा अवघड ती सोडवावीच लागते.

(३) आपला मुद्दा पटवून द्यावा. वाद घालू नये.

→ आपला मुद्दा पटवून द्यावा; पण वाद घालू नये.

(४) वाटेत धो-धो पाऊस लागला. मला यायला उशीर झाला.

→ वाटेत धो-धो पाऊस लागला म्हणून मला यायला उशीर लागला.

**लक्षात ठेवा-** संयुक्त वाक्य तयार करताना प्रधानत्वसूचक व काही गौणत्वसूचक अशी दोन्ही प्रकारची उभयान्वयी अव्यये वापरली जातात.

## कृती

**(१) खालील वाक्यांचे संयुक्त, मिश्र व केवल वाक्य असे वर्गीकरण करा.**

(१) मी माणसे मोजून पाहिली; पण ती आठच भरली.

(२) सोनाली चहा किंवा कॉफी घेते.

(३) आम्ही मुंबईला पोहोचलो आणि खूप अडचणी निर्माण झाल्या.

(४) पाऊस पडला, तर शेतकरी वर्ग आनंदी होईल.

(५) मुले बागेत खेळली. ती खूप दमली.

(६) सर म्हणाले, की प्रामाणिक प्रयत्नांनी यश मिळते.

**(२) सूचनेनुसार वाक्यसंश्लेषण करा.**

(१) तो उत्तीर्ण झाला. सर्वांना आनंद झाला. (केवल वाक्य करा.)

(२) श्याम घरी आला. वादळाला सुरुवात झाली. (मिश्र वाक्य करा.)

(३) आम्हाला शिकवायला नवीन शिक्षक आले. आमच्या अडचणी दूर झाल्यात. (संयुक्त वाक्य करा.)

(४) माझे वडील म्हणाले. मला तुझे यश बघून तुझा अभिमान वाटला. (मिश्र वाक्य करा.)

(५) हे आधुनिक लोकशाहीचे युग आहे. जाहिरातीला महत्त्व आहे. समाजाने जाहिरातीचा योग्य अर्थ समजून घ्यावा. (केवल वाक्य करा.)